# कोल्हापूर जिल्हा परिषद अंतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गाची विशेष पदभरती सन-२०१९
## जाहिरात क्रमांक - २ /२०१९

जिल्हा परिषद, **कोल्हापूर**चे अधिनस्त शासन निर्णय दि.२१ डिसेंबर २०१९ नुसार विविध विभागांकडील सरळसेवेने भरावयाची गट-क संवर्गातील अनु. जमातीची अधिसंख्य पदे विचारात घेऊन खालील पदांकरिता पात्र जात वैद्यता प्रमाणपत्र धारक उमेदवारांकडून विहित नमुन्यात व फक्त ऑफलाईन पद्धतीनेच, अर्ज मागविण्यांत येत आहेत. सदरचे अर्ज हे **दि.२८.१२.२०१९** रोजी सकाळी १० वाजल्यापासून ते **दि. ०६.०१.२०२०** रोजी सायंकाळी **५.४५** वाजेपर्यन्त स्विकारणेत येतील.

**<u>पदभरतीसाठी संवर्गनिहाय रिक्त पदे</u>**

| अ.क्र. | संवर्ग | प्रवर्ग | एकूण रिक्त पदे |
|---|---|---|---|
| ०१ | कनिष्ठ सहाय्यक (लिपिक) | अनु. जमाती | १ |
| ०२ | ग्रामसेवक (कंत्राटी) | अनु. जमाती | १ |
| ०३ | शिक्षण सेवक | अनु. जमाती | ४ |
| | | एकूण | ६ |

सरळसेवा भरती प्रक्रियेसंदर्भातील सविस्तर जाहिरात www.zpkolhapur.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध असून, सदर जाहिरातीत भरावयाच्या पदांची नांवे, संख्या व सामाजिक व समांतर आरक्षणानुसारची विगतवारी, पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता व लेखी परीक्षेचे वेळापत्रक, विहित वयोमर्यादा, लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप सर्वसाधारण सूचना, विशेष सूचना, पदांच्या निवडीसाठीची विहित कार्यपद्धती, अटी व शर्ती, विहित परीक्षा शुल्क, अर्ज करण्याची पद्धत व सर्व पदांसाठीच्या समान सूचना दिलेल्या असून उमेदवारांनी ही संपूर्ण माहिती काळजीपूर्वक समजून घेऊनच अर्ज करावेत. अर्जाचा नमुना उक्त संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवाराने सदरचा अर्ज जाहिरातीत नमुद पद्धतीनुसार व सूचनांनुसार अर्ज भरावा.

सदर भरतीप्रक्रियेबाबत अद्ययावत सूचनांचे निवेदन www.zpkolhapur.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल आणि भरती प्रक्रिये कालावधीमध्ये माहितीबाबत अद्ययावत राहण्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवारांची राहील.

दिनांक २७/१२/२०१९

स्वाक्षरीत/-
**सदरस्य सचिव**
**जिल्हा निवड समिती तथा,**
**अति. मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

स्वाक्षरीत/-
**सदस्य**
**जिल्हा निवड समिती तथा,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

स्वाक्षरीत/-
**अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती तथा,**
**जिल्हाधिकारी, कोल्हापूर**

Scanned by CamScanner

# कोल्हापूर जिल्हा परिषद अंतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गाची विशेष पदभरती सन-२०१९

## सविस्तर जाहिरात क्रमांक - २ /२०१९

## दिनांक: २८.१२.२०१९

सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब दिनांक २१ डिसेंबर २०१९ व ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१८/प्र.क्र.२२६/भाग-२/आस्था ८ दिनांक २४ डिसेंबर २०१९ अन्वये विहित तरतुदी आणि निर्देशानुसार जिल्हा परिषद, **कोल्हापूर**चे अधिनस्त विविध विभागांकडील, सरळसेवेने भरावयाची गट-क संवर्गातील अनुसूचित जमाती प्रवर्गातील जात वैद्यता प्रमाणपत्र धारक विशेष भरती मांहिमेअंतर्गत फक्त अनुसुचित जमाती प्रवर्गातील उमेदवारामधून विहित नमुन्यात व ऑफलाईन पद्धतीनेच पात्र उमेदवारांकडून समक्ष अथवा पोस्टाने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अर्ज भरण्याची सुरवात | अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दिनांक- २८.१२.२०१९ रोजी सकाळी १०.०० पासून | दिनांक- ०६.०१.२०२० सायंकाळी ५.४५ पर्यंत |

सरळसेवा भरती प्रक्रिये संदर्भातील सविस्तर जाहिरात **www.zpkolhapur.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असून, उमेदवारांनी संपूर्ण माहिती काळजीपूर्वक समजून घेऊनच आपले अर्ज भरावेत. प्रस्तुत पदांकरीता केवळ डिमांड ड्राफ्ट व्दारे भरलेले परीक्षा शुल्क ग्राह्य धरण्यात येईल. अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. उपरोक्त संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहिती बाबत सतत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, परीक्षेचा प्रकार, समांतर आरक्षणात अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार, तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, **कोल्हापूर** हे स्वतःकडे राखून ठेवीत आहेत. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

**शिक्षण सेवक पदाकरीता अभियोग्यता व बौध्दिमता चाचणी (TAIT ) तसेच TET (शिक्षक पात्रता परीक्षा) उत्तीर्ण असणारे उमेदवाराच अर्ज करु शकतील.**

सदर जाहिरातीत नमूद भरती संबंधी आवश्यक सर्व शासन निर्णय महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर अथवा संबंधित विभागांच्या संकेतस्थळांवर उपलब्ध आहेत.

Scanned by CamScanner

## जि.प.कोल्हापूर सरळसेवा भरती- सन २०१९

## भरावयाच्या पदांची नावे, संख्या व सामाजिक व समांतर आरक्षणानुसार विगतवारी

| पद क्र. | सामाजिक प्रवर्ग | एकूण पदे | समांतर आरक्षणा शिवाय | महिला | खेळाडू | माजी सैनिक | प्रकल्प ग्रस्त | भूकंपग्रस्त | अंशकालीन कर्मचारी | अनाथ | अपंग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **कनिष्ठ सहाय्यक (लिपिक) - पद संख्या - १** | | | | | | | | | | |
| | अनु.जमाती | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण** | **१** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** |
| २ | **ग्रामसेवक (कंत्राटी ) - पद संख्या - १** | | | | | | | | | | |
| | अनु.जमाती | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण** | **१** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** |
| ३ | **शिक्षण सेवक - पद संख्या - ४** | | | | | | | | | | |
| | अनु.जमाती | ४ | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण** | **४** | **३** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** |

Scanned by CamScanner

## पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता

खालील नमूद केलेली शैक्षणिक अर्हता ही दि. ०६.०१.२०२० या दिनांकास पूर्ण धारण करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | पदाचे नांव व वेतन श्रेणी | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | **कनिष्ठ सहाय्यक** (लिपिक) **मॅट्रीक्स एस-६ वेतन रु.१९९००-६३२००/-** | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा तुलय परीक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि महाराष्ट्र शासनाच्या शासकिय कर्मचाऱ्यांची मराठी टंकलेखन व लघुलेखन यातील परीक्षा घेण्यासाठी असलेल्या तदर्थ मंडळाने किंवा आयुक्त, शासकिय परीक्षा विभाग, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी अनुक्रमे मराठी व इंग्रजी टंकलेखनाचे दर मिनिटाला ३० शब्द या गतीने दिलेले प्रमाणपत्र धारण करीत असतील किंवा टंकलेखनामध्ये ५० टक्के गुण मिळवून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा अथवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करणेत येईल.<br>परंतु असे की, उक्त दोन भाषा पैकी कोणत्याही एका भाषेतील गतीच्या प्रमाणपत्रानुसार नियुक्त केलेले उमेदवार, नियुक्ती केलेल्या तारखेपासून दोन वर्षाच्या कालावधीत दुसऱ्या भाषेतील दर मिनिटास ३० मिनिटाहून कमी नाही अशा टंकलेखनाच्या गतीचे प्रमाणपत्र मिळवतील असे वेगाचे प्रमाणपत्र प्राप्त न केल्यास, राज्य शासन त्याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेश काढून ठरवील अशा कारवाईस ते पात्र ठरतील.,<br>परंतु आणखी असे की, इंग्रजी विषय घेऊन माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले किंवा इतर भाषेतील टंकलेखनाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती दिली जाईल., |
| २ | **ग्रामसेवक (कंत्राटी)** मानधन दरमहा रु.६०००/- | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण व कृषि पदविका दोन वर्षाचा अभ्यासक्रम धारण करीत असतील किंवा कृषि पदवीधर, कृषि पदव्युत्तर पदवीधारक/बी.टेक. (ॲग्रो इंजिनिअरींग)/ यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाकडील कृषि व्यवसाय व्यवस्थापन पदविका/फळबाग उत्पादन पदविका/भाजीपाला उत्पादन पदविका/फुलशेती व प्रांगण उद्यान पदविका २ वर्षे आणि बी.एस्सी. (कृषि/उद्यानविद्या) **किंवा**<br>उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य अर्हता परीक्षेत किमान ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण किंवा शासनमान्य संस्थेची अभियांत्रिकी पदविका (तीन वर्षाचा अभ्यासक्रम) किंवा शासनमान्य संस्थेची समाजकल्याणची पदवी (BSW) आणि संगणक हाताळणी/ वापराबाबत माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि) विभागाने शासन निर्णय दि.४ फेब्रुवारी २०१३ ने विहित केलेल्या पैकी संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. |
| ३ | **शिक्षण सेवक** मानधन दरमहा रु.६०००/- | शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण केलेले तसेच शिक्षक पात्रता परीक्षा (TET) उत्तीर्ण व अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी परीक्षा उत्तीर्ण |

**विशेष सुचना :- १) शासन निर्णय २१ डिसेंबर २०१९ नुसार जात वैद्यता प्रमाणपत्र धारक उमेदवारांनीच अर्ज करणेचा आहे.**

**२) शिक्षण सेवक पदा करीता आवश्यक असलेल्या अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी यामध्ये मिळालेल्या उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांमधून निवड केली जाणार आहे.**

**३) शिक्षण सेवक पदाकरीता अभियोग्यता व बौध्दिमता चाचणी (TAIT ) तसेच TET (शिक्षक पात्रता परीक्षा) उत्तीर्ण असणारे उमेदवाराच अर्ज करु शकतील.**

Scanned by CamScanner

- **भरतीबाबतचे लेखी परीक्षेबाबतची माहिती**

**ग्राम विकास विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक एपिटी-२०१४/प्र.क्र.-१३९/आस्था-८ दिनांक ५ जुलै २०१४ नुसार**

| अ. क्र. | पदनाम | लेखी परीक्षा विषय / गुण | | | | | | | | | | एकूण गुण | | प्रश्नपत्रिका दर्जा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मराठी | | इंग्रजी | | सामान्य ज्ञान | | बुध्दी मापन व गणित | | तांत्रिक | | | | |
| | | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | |
| १ | कनिष्ठ सहाय्यक (लिपिक) | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | - | - | १०० | २०० | सर्व विषय एस.एस.सी. दर्जाची परीक्षा |
| २ | ग्रामसेवक (कंत्राटी) | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० | सर्व विषय एच.एस.सी. दर्जाची परीक्षा व कृषि पदविका दर्जाचे प्रश्न |
| ३ | शिक्षण सेवक | लेखी परीक्षा घेणेत येणार नाही. | | | | | | | | | | | | |
| महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र. एपिटी-२०११/ प्र.क्र.१२९/ आस्थापना -८ दि.०५ जून, २०११ व सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रानिमं १२१४/ (प्र.क्र.४३/१४)/१३-अ दि.०५ जून, २०१४ तसेच शासन निर्णय क्र. प्रानिमं १२१५/(प्र.क्र.१०९/१५)/ १३-अ दि.०५ ऑक्टोबर, २०१५ अन्वये उपरोक्त पदांना मौखिक परीक्षा / मुलाखती लागू नाहीत. | | | | | | | | | | | | | | |

## परीक्षेचे माध्यम

ग्राम विकास विभाग कडील पत्र दिनांक २१/०१/२०१९ नुसार

| अ.नं. | संवर्गाचे नांव/पदनाम | परीक्षेचे माध्यम |
|---|---|---|
| १ | कनिष्ठ सहाय्यक (लिपिक) | मराठी |
| २ | ग्रामसेवक (कंत्राटी) | मराठी |
| ३ | शिक्षण सेवक | परीक्षा घेणेत येणार नाही. |

- **अर्ज स्विकारणेचा कालावधी व प्रवेश पत्र वितरणाचा कालावधी**

| अ.क्र | पदांचे नांव | अर्ज स्विकारण्याचा कालावधी | प्रवेशपत्र वितरणाचा कालावधी | अर्ज कोणाचे नांवे करावयाचा, | अर्ज करावयाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) | २८/१२/२०१९ ते ०६/०१/२०२० | १०/०१/२०२० पासून | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, कोल्हापूर | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) पहिला मजला जिल्हा परिषद, कोल्हापूर फोन नं.(०२३१) २६५५४१६ |
| २ | कंत्राटी ग्रामसेवक | | १०/०१/२०२० पासून | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, कोल्हापूर | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) पहिला मजला जिल्हा परिषद, कोल्हापूर फोन नं.(०२३१) २६५५४८६ |
| ३ | शिक्षण सेवक | | लेखी परीक्षा नाही | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, कोल्हापूर | शिक्षणाधिकारी (प्राथ.) तळ मजला जिल्हा परिषद, कोल्हापूर फोन नं.(०२३१) २६५०७८१ |

उमेरवाराने परीक्षेचे प्रवेशपत्र उपरोक्त दिनांकास समक्ष येऊन घेऊन जाणेचे आहे.

Scanned by CamScanner

**वयोमर्यादा :**

**अ)** वयोमर्यादेकरितां उमेदवाराचे वय अर्ज करावयाच्या शेवटच्या दिनांकास म्हणजेच **दि. ०६.०१.२०२०** रोजीचे वय विचारांत घेतले जाईल.

**ब) दि.०६/०१/२०२०** रोजी उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे तसेच सामाजिक व समांतर आरक्षणानुसार खालीलप्रमाणे वयोमर्यादा विचारात घेण्यात येईल. विहित वयोमर्यादा कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

| **अ.क्र.** | **आरक्षण / संमातर आरक्षण** | **शासन नियमानुसार आरक्षणाकरिता कमाल वयोमर्यादा** |
|---|---|---|
| १ | मागासवर्गीय उमेदवार | **४३ वर्षे** |
| २ | अपंग उमेदवार | **४५ वर्षे** |
| ३ | प्रकल्पग्रस्त | |
| ४ | भूकंपग्रस्त | |
| ५ | सन १९९१ ची जनगणना / सन १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी | |
| ६ | अपंग माजी सैनिक | |
| ७ | स्वातंत्र्य संग्राम सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य | |
| ८ | शासकीय कर्मचारी/जिल्हा परिषदेकडील स्थायी कर्मचारी (सबंधीत नियुक्ती प्राधिकारी/सक्षम प्राधिकारी यांची परवानगी आवश्यक राहील.) | |

माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सवलत, सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक मासैक-१०१०/प्र.क्र. २७९/१०/१६अ दि २० ऑगस्ट २०१० प्रमाणे सदर उमेदवाराच्या सशत्र दलात झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक ३ वर्षे राहील. तसेच अपंग माजी सैनिकासाठी शासन सेवेतील वर्ग ३, वर्ग ४ च्या पदासाठी कमाल वय मर्यादा ४५ वर्षे राहील.

**लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे राहील.**

१) शासन परिपत्रक क्र.एपिटी-२०१४/प्रक्र-१३९/आस्था-८ दि.०५.०७.२०१४ च्या सोबत जोडलेल्या परिशिष्ट `अ` नुसार तसेच सा.प्र.वि. शा.नि. क्र.प्रानिम१२१६/(प्र.क्र.६५/१६)/१३-अ दिनांक १३ जुन २०१८ नुसार प्रश्नपत्रिकेचे स्वरुप, दर्जा व गुण राहतील.

२) परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील.

३) जिल्हास्तरीय पदांसाठी निवड होणाऱ्या उमेदवारांना **कोल्हापूर** जिल्ह्याचा भूगोल, सामाजिक इतिहास, हवामान इ. स्थानिक बाबींची माहिती असणे आवश्यक आहे.

४) लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांना अंतिम निवडीसाठी शैक्षणिक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी वेळीच उपलब्ध करून द्यावी लागतील अन्यथा निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

५) लेखी परीक्षेसाठी पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, कागदपत्रे तपासणी/छाननी, संबंधित सूचना या www.zpkolhapur.gov.in या संकेत स्थळ व जिल्हा परिषदेचे नोटीस बोर्डवर उपलब्ध करण्यात येतील. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती/कार्यक्रमाबाबत अद्ययावत माहिती घेण्याची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील.

**६) उमेदवारांनी त्यांच्याकडे असलेल्या मूळ कागदपत्रांवरुन माहिती भरुन लेखी परीक्षेस बसण्याची संधी प्राप्त करतील. सदर उमेदवार लेखी परीक्षेच्या गुणानुक्रमानुसार पुढील प्रक्रियेसाठी पात्र ठरल्यास त्यांचे मूळ कागदपत्रे पडताळणी करतेवेळी सदर कागदपत्रांमध्ये खोटी प्रमाणपत्र/असत्य अथवा चुकीची प्रमाणपत्र आढळल्यांस त्यांच्याविरुध्द भारतीय दंड संहितेतील तरतुदी नुसार फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यांत येईल.**

**७) शिक्षण सेवक पदा करीता लेखी परीक्षा घेणेत येणार नाही. त्यांची भरती अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारावर करणेत येणार आहे.**

Scanned by CamScanner

## विशेष सूचना-

१) शासन निर्णय २१ डिसेंबर २०१९ नुसार जात वैद्यता प्रमाणपत्र धारक उमेदवारांनीच अर्ज करणेचा आहे.

२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र . प्रशासन २०००/प्र.क्र . ५/२००१/३२,दि. २० जुलै २००२ व आनुषंगिक सुधारित शासन निर्णयान्वये उपरोक्त पदांकरिता अर्ज करणाऱ्या उमदेवारांनी संगणक हाताळणी /वापराबाबतचे खाली नमूद केलेले प्रमाणपत्र **(आवश्यक त्या पदांकरिता )** त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आंत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्याची सेवा समाप्त होईल.

अ) D.O.E.A.C.C सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा

ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ , मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा

क) माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.)विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९ मंत्रालय, मुंबई-३२ दि.४ फेब्रुवारी २०१३ अन्वये नमूद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल. व क्र. मातंस-२०१२/प्र.क्र.२७७/३९ दिनांक ०८ जानेवारी २०१८ नुसार संगणक अर्हता प्राप्त करणे अनिवार्य राहिल.

३) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अनियो/१००५/१२६ सेवा-४ दि.३१ ऑक्टोबर २००५ अनुसार दि. ०१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल, त्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. मात्र सध्या आस्तित्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या आस्तित्वात असलेल्या सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.)

४) निवड झालेल्या उमेदवारांना अतिदुर्गम/दुर्गम भागात रिक्त पदी प्रथम पदस्थापना देण्यात येईल.उमेदवारांनी पदस्थापनेबाबत कोणत्याही प्रकारे सक्षम प्राधिकाऱ्यांवर दबाव आणल्यास त्यांचे नाव निवड यादीतून कमी करण्यात येईल.

५) सदर भरतीचे नियम/निकषामध्ये पद भरती पुर्ण होईपर्यंत वेळोवेळी निर्गमीत होणाऱ्या शासन निर्णय/परिपत्रके/अधिसुचना यानुसार बदली होऊ शकतो.

६) उमेदवाराने अर्जावर नमूद केलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचून अर्ज विहीत नमुन्यात परिपूर्ण भरणेचा आहे. अर्जावर उजव्या बाजूस **पासपोर्ट साईज फोटो लावून तो राजपत्रित अधिकारी किंवा विशेष कार्यकारी अधिकारी यांचेकडून साक्षांकीत करावा.** अर्ज हे संबंधित विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर येथील संबंधीत खाते प्रमुख यांचे कार्यालयात समक्ष स्विकारले जातील. पोष्टाव्दारे अर्ज पाठवितांना पाकीटावर ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचा ठळक अक्षरात उल्लेख करुन अर्ज पाठवावेत. पोष्टाव्दारे पाठविलेले अर्ज हे अर्जाचे अंतिम **दि. ०६/०१/२०२०** पर्यंत सायंकाळी ५.४५ वा. पर्यंत प्राप्त झालेलेच फक्त स्विकारले जातील. मुदतीनंतर कोणत्याही मार्गाने आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. व याबाबत उमदेवारांस कोणतीही तक्रार करता येणार नाही.

Scanned by CamScanner

## पदांच्या निवडीसाठी कार्यपध्दती, अटी व शर्ती.

१. जाहिरातीत नमूद संवर्गनिहाय आवश्यक पात्रता/निकष व उमेदवाराने ऑनलाईन अर्जात भरलेल्या माहितीच्या आधारे संबंधित उमेदवारांस परीक्षेस बसण्याची परवानगी तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येणार असून, त्या आधारे लेखी परीक्षेत प्राप्त गुणांच्या गुणानुक्रमानुसार पात्र उमेदवारांना त्यांचे मूळ शैक्षणिक व इतर कागदपत्र पडताळणीकरीतां अंतरिम स्वरूपात यादी प्रसिद्ध करण्यात येईल. ज्या उमेदवारांची जाहिरातीमध्ये नमूद केलेनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती, परीक्षा शुल्क व मूळ कागदपत्रांच्या तपासणीनंतर परिपूर्ण असल्याचे सिद्ध होईल अशा उमेदवारांचाच विचार अंतिम निवडीसाठी करण्यात येईल. म्हणून उमेदवारांनी अर्जामध्ये माहिती भरतांना सदर पदासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा, सामाजिक व समांतर आरक्षणासाठी आवश्यक प्रमाणत्रे/दाखले प्राप्त केलेले असणे आवश्यक आहे.

२. सामान्य प्रशासन विभागाकडील, पुरक पत्र क्र.प्रानिमं-१२१७५/(प्र.क्र.९२/१७)/१३-अ. दि. ०२ डिसेंबर, २०१७ व शा. नि. क्र. प्रानिमं१२१६/(प्र.क्र.६५/१६)/१३-अ दिनांक १३ जून २०१८ अन्वये लेखी परीक्षेत समान गुण मिळाल्यास अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम खालील निकषांवर क्रमवार लावला जाईल.

अ) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या उमेदवारास प्रथम प्राधान्य राहील.

ब) वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

क) समान वय असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतम शैक्षणिक अर्हता (पदव्युत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. )

ड) वरील प्रमाणे दोन्ही अटी समान ठरत असल्यास उमेदवाराच्या बाबतीत, सदर पदाकरीता आवश्यक असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

३. महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभागाकडील, शासन निर्णय क्र.प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दिनांक २७ जून, २००८ मधील मुद्दा क्रमांक ७ नुसार निवड समितीने तयार केलेली निवडसूची एक वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आलेली आहेत त्या दिनांकापर्यंत, जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधिग्राहय ठरेल. त्यानंतर सदर निवडसूची व्यपगत होईल.

४. पदांच्या निवडीसाठी उपरोलिखित व वेळोवेळी दिलेले शासन निर्णय लागू राहतील.

५. शासन निर्णय २१ डिसेंबर २०१९ नुसार जात वैद्यता प्रमाणपत्र धारक उमेदवारांनीच अर्ज करणेचा आहे.

**प्रमाणपत्र पडताळणी -**

१) निवड समितीने निश्चित केलल्या किमान सिमारेषेनुसार शिफारस पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता, जाहिरात/सेवाप्रवेश नियमातील अर्हता/ अटी व शर्ती नुसार मूळ कागदपत्र सादर करणाऱ्या उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी केली जाईल.

२) अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणाऱ्या उमेदवाराच्या प्रमाणपत्रांची पडताळणी केली जाईल.

३) अर्जातील दाव्यानुसार सक्षम प्राधिकाऱ्याकडून करण्यात आलेल्या प्रमाणपत्र पडताळणीच्या आधारे पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच नियुक्ती देण्याची कार्यवाही नियुक्ती प्राधिकारी यांचेकडून करण्यात येईल.

**परीक्षा शुल्क :**

उमेदवारांना **परिक्षा शुल्क मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु. २५०/-** असे राहील. विहीत परिक्षा शुल्काप्रमाणे कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा व कोल्हापूर येथे देय असलेला रेखांकित डीमांड ड्राप्ट (धनाकर्ष) हा **मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद,कोल्हापूर** (Chief Accounts & Finance Officer, Z.P. Kolhapur) यांचे नांवे काढून परिपूर्ण अर्जासोबत जोडणेचा आहे. डी.डी. च्या मागे अर्जदाराने संपूर्ण नांव व पत्ता लिहणेचा आहे. **परिक्षा शुल्क हे नापरतावा राहील.** ( **माजी सैनिकांना परिक्षा शुल्क लागू नाही** ). अर्जासोबत परिक्षा शुल्क डीमांड ड्राप्ट न जोडलेस अर्ज अपात्र केला जाईल.

Scanned by CamScanner

**<u>अर्ज करण्याची पद्धत व सर्व पदांसाठी समान सूचना -</u>**

१. उमेदवारांचे अर्ज ऑफलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येणार असल्याने, अर्ज करतांना शैक्षणिक कागदपत्रे व अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक आहे. तथापि, उमेदवाराने अर्ज सादर करतांना सदर पदासाठीचे पात्रता निकष पूर्ण असल्याबाबत खात्री करुन प्रमाणपत्रांवरुन बिनचुक माहिती अर्जात भरावी. अर्ज भरतांना काही चुका झाल्यांस किंवा त्रुटी राहिल्यांस व **<u>भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यांस</u>** त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारांस तक्रार करता येणार नाही. अर्जात भरलेली माहिती नंतर बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच अर्ज भरावा.

२. उमेदवारास पात्रता परीक्षेसाठी देण्यात येणारा प्रवेश हा त्यांनी त्यांनी अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या अधिन राहून देण्यात येणार असल्याने पद निहाय पात्रता परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे सदर कागदपत्रांच्या तपासणी अगोदरपर्यंत उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाही. कागदपत्रांच्या पूर्ण छाननी/पडताळणी नंतरच उमेदवारांची पात्रता गुणवत्तेच्या व जिल्हा प्राधान्यक्रमाच्या आधारे निश्चित करण्यात येईल.

३. अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना www.zpkolhapur.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

४. माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत सैन्यात काम केल्याबाबतचे आवश्यक कागदपत्र व जिल्हा सैनिक बोर्डात नांवनोंदणी केले असल्याबाबतचे प्रमाणपत्र व सेवा तपशील दर्शविणारे अभिलेख प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तसेच, निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्राची सक्षम अधिकाऱ्याकडून पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती देण्यात येणार नाही. तसेच सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.आरटीए १०९२/६२/प्र.क्र. २२२/९१/२८ दिनांक ३० डिसेंबर १९९१ अन्वये माजी सैनिकांना शासन सेवेत नागरी सेवेतील पदावर नियुक्ती साठी देण्यात येणाऱ्या सवलतींचा त्यांनी एकदा फायदा घेतल्यावर नागरी सेवेतील पदावर नेमणूकीसाठी दुसऱ्यांदा तसा फायदा घेता येणार नाही.

५. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे किंवा त्याचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा दाखला सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात डॉमिसाईल प्रमाणपत्राची अट लागू रहाणार नाही. तसेच, सदर परीक्षार्थीकडे जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या परीक्षार्थीने शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु, सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद आवश्यक आहे. उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परीक्षार्थींना लागू राहतील.

६. शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या संबंधित नियुक्ती प्राधिकरणाच्या परवानगीने भरावयाचे आहेत. अशा परवानगी पत्राची प्रत कागदपत्र पडताळणीचे वेळी उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे.

७. सामान्य प्रशासन विभागाकडील अधिसूचना क्र. एसआरव्ही २०००/प्रक्र-१७/२०००/१२ दि. २८ मार्च २००५ व शासन परिपत्रक एसआरव्ही-२०००/प्र.क्र १७/२००० दि. ०१ जुलै २००५ अन्वये विहित केले अनुसार लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र नमुना अ आवश्यक अर्हता म्हणून भरणे आवश्यक आहे. उमेदवार अविवाहित असल्यास, अर्जात याबाबत स्पष्ट उल्लेख करावा. व अर्जासोबत सदरचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुबांचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाच्या नमुना - अ**

प्रतिज्ञापन (नियम ४ पहा)

मी श्री. श्रीमती /कुमारी ------------------------------ श्री. ------------------ यांचा /यांची / मुलगा / मुलगी / पत्नी वय............वर्ष राहणार- ------------------------------ याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहीर करते /करतो की,

१) मी ------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला ............. (संख्या) इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या-..................आहे (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

१. दि. / /     २. दि. / /

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल, तर दिनाक २८ मार्च २००५ तदनंतर जन्माला आलेल्या, मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :- / /२०१९

**अर्जदाराची सही**

Scanned by CamScanner

८. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनांस आल्यांस त्या उमेदवारांची उमेदवारी/नियुक्ती रद्द करण्यात येईल व शासनाची दिशाभूल केल्या प्रकरणी सदर उमेदवारां विरूद्ध योग्य ती कारवाईही करण्यात येईल.

९. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक चारित्र्य-२०१७/प्र.क्र.४८३/१६-अ दिनांक २८ ऑगस्ट २०१७ नुसार अंतिम निवड झालेल्या उमेदवारास कार्यालयाकडे साक्षांकन नमूना भरुन दयावा लागेल. त्या आधारे त्या त्या जिल्ह्यातील पोलिस अधीक्षक कार्यालयाकडून चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त करुन घेणेत येईल. चारित्र्य-पूर्वचारित्र्य पडताळणीअंती आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास, संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी/सेवेसाठी पात्र राहणार नाही. तसेच, कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील.

१०. निवड झालेल्या उमेदवारांना आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्र/हमीपत्र इ. ची पूर्तता करणे आवश्यक राहील तसेच, त्या प्रमाणपत्रांची पडताळणी विहित पद्धती अनुसार करून घेणेही बंधनकारक राहील. सेवेत नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना नियमानुसार आवश्यक ती परीक्षा/प्रशिक्षण विहित मुदतीत उत्तीर्ण/पूर्ण करणे आवश्यक राहील.

११. अपरिहार्य कारणास्तव अथवा नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा शासन आदेशाने विहित दिनांकास लेखी परीक्षा घेणे शक्य नसेल तर शासन ठरवून देईल त्याप्रमाणे सोईच्या दिवशी लेखी परीक्षा घेणेत येईल. याबाबत वृत्तपत्राद्वारे/संकेतस्थळावर/ईमेल/मोबाईल एसएमएस व्दारे कळविणेत येईल.

१२. लेखी परीक्षेसाठी व कागदपत्रे पडताळणीसाठी उमेदवारांस स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१३. वरील अटी, शर्ती, नियमांव्यतिरिक्त शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश व निर्णय लागू राहतील.

१४. सदर भरती प्रक्रियेसंदर्भात जिल्हा निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

१५. जाहीरातीमधील काही मुद्दे भरती नियमावली व शासन निर्णयाशी विसंगत असल्यास प्रत्यक्षात निवड प्रक्रिया ही महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ (मराठी/इंग्रजी प्रत) मधील तरतूद व निवड प्रक्रिया अंतिम होईतोपर्यंत प्राप्त शासन अधिसूचना/शासन निर्णय/शासन परिपत्रक व शासन सूचना त्या त्या पदास लागू असल्यास त्याप्रमाणे निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल, याबाबत कोणासही आक्षेप घेता येणार नाही.

१६. शासनाच्या धोरणानुसार काही संवर्गाची अथवा सर्व भरती प्रक्रिया रद्द करणेचे आदेश प्राप्त झालेस तसेच भरती प्रक्रिया वेळापत्रकामध्ये काही बदल झालेस, अर्ज सादर केलेल्या उमेदवारांचे परीक्षा शुल्क ना-परतावा असेल.

**रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | भरती प्रक्रिया कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १. | अर्ज ऑफलाईन पध्दतीने भरण्याचा कालावधी | दि.२८.१२.२०१९ (सकाळी १०.०० वाजेपासून) ते दि.०६.०१.२०२० (सायं.५.४५ वाजेपर्यन्त) |
| २. | परीक्षेचे प्रवेशपत्र वाटप | दि. १० /०१/२०२० पासून |
| ३. | परीक्षा दिनांक | रविवार दि. १२ /०१/२०२० |
| ४. | **शिक्षण सेवक पदा करीता लेखी परीक्षा घेणेत येणार नाही.** | |

स्वाक्षरीत/-
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

स्वाक्षरीत/-
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

स्वाक्षरीत/-
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी(सा.)**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

स्वाक्षरीत/-
**सदस्य सचिव**
**जिल्हा निवड समिती तथा**
**अति. मुख्य कार्यकारी अधिकारी**

स्वाक्षरीत/-
**सदस्य**
**जिल्हा निवड समिती तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

स्वाक्षरीत/-
**अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हाधिकारी,**
**कोल्हापूर**

Scanned by CamScanner

याठिकाणी उमेदवाराने अलिकडील काळातील पासपोर्ट साईज फोटो लावावा व तो राजपत्रित अधिकारी किंवा विशेष कार्यकारी अधिकारी यांचेकडून साक्षांकीत करावा

## जिल्हा परिषद, कोल्हापूर.

## अर्जाचा नमुना

**प्रति,**
सदस्य, जिल्हा निवड समिती कोल्हापूर
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,कोल्हापूर.

**भरती पदाचे नांव :-** ------------------------------------------

१) उमेदवाराचे संपूर्ण नांव :- आडनांव ------------------ स्वतःचे नांव ------------------ वडीलांचे / पतीचे नांव ------------------

२) उमेदवाराचे नांवात बदल असलेस :- ------------------ ------------------ ------------------

३) पत्र व्यवहाराचा पत्ता :- ------------------------------------------------------------------------

------------------------------------------ * भ्रमणध्वनी क्र.- *ई-मेल-

४) जात ---------------- पोट जात ----------- ५) जात वैद्यता प्रमाणपत्र आहे/नाही.

जातीचा प्रवर्ग
(योग्य ठिकाणी (✓) अशी खूण करावी.)

| अनु. जाती | |
|---|---|

६) अर्जदाराची जन्म तारीख (अंकामध्ये ) (शालांत प्रमाणपत्रा प्रमाणे)

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

७) उमेदवाराचे अर्ज स्विकारणेच्या अंतिम दिनांकास दि.०६/०१/२०२० रोजी असलेले वय

| वय वर्षे | महिने | दिवस |
|---|---|---|
| | | |

८) महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात काय?**(डोमिसाईल प्रमाणपत्र जोडणे आवश्यक)** **होय / नाही**

९) अर्जदार स्त्री आहे की पुरुष ? **( स्त्री ) / ( पुरुष ) -- (विवाहित) / (अविवाहित)**

१०) **अर्जदाराची शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचा तपशिल)**

| शैक्षणिक पात्रता | परीक्षा मंडळाचे नांव | उत्तिर्ण होण्याचे वर्ष | एकूण गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

११) नांव नोंदणी केलेल्या सेवायोजन कार्यालयाचे नांव ------------------ नोंदणी क्रमांक ---------- व दिनांकः- / /

१२) बँकेचे नांव ------------------ डी.डी.क्रमांक - ---------- दिनांकः- / /२० रक्कम रु.२५०/-

१३) शिक्षण सेवक पदा करीता TET --------प्राप्त गुण व TAIT उत्तीर्ण ----------- प्राप्त गुण

वर नमूद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचूक आहे. मी प्रमाणित करतो / करते की, अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आलेस अर्ज अपात्र करणेस, नोकरी गमाविण्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या इतर कारवाईस मी पात्र व बांधिल राहीन.

ठिकाण :- अर्जदाराची स्वाक्षरी

दिनांक :- अर्जदाराचे संपूर्ण नांव :- ------------------

---

**टिप :-** सदर अर्जा सोबत खालील प्रमाणे कागदपत्रे स्वयंम साक्षांकित केलेली जोडणेत यावीत.

५) शैक्षणिक अर्हत गुणपत्रक/प्रमाणपत्रे २) संगणक अर्हता प्रमाणपत्र ३) जात प्रमाणपत्र व जात वैद्यता प्रमाणपत्र ४) प्रवेशपत्र सोबतच्या नमून्यात (शिक्षण सेवक पद बगळून) ५) जन्म तारीख पुरावा (उदा. १० वी प्रमाणपत्र, शाळा सोडलेचा दाखला,बोनाफाईड, जन्मदाखला यापैकी एक पुरावा)

६) शिक्षण सेवक पदा करीता अर्जासोबत TET व TAIT उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्रक छायांकित प्रत जोडणे आवश्यक

Scanned by CamScanner

# जिल्हा परिषद, कोल्हापूर

<table>
<tr><td>जिल्हा परिषद, कोल्हापूर</td><td>प्रवेशपत्र<br>अहस्तांतरणीय</td></tr>
<tr><td>उमेदवाराचे संपूर्ण नांव :- ---------------------------------------<br>पदाचे नांव :- ---------------------------------------<br>उमेदवाराची स्वाक्षरी<br><br>खालील बाबी कार्यालयाने भरावयाच्या आहेत उमेदवारांनी भरु नयेत.<br>बैठक क्रमांक :-<br>परिक्षा दिनांक व वेळ :-<br>परिक्षा केंद्र :-</td><td>याठिकाणी उमेदवाराने अलिकडील काळातील पासपोर्ट साईज फोटो लावावा व तो राजपत्रित अधिकारी किंवा विशेष कार्यकारी अधिकारी यांचेकडून साक्षांकीत करावा.<br><br>विभाग प्रमुख,<br>जिल्हा निवड समिती, कोल्हापूर</td></tr>
</table>

**महत्वाच्या सूचना:-**

१) उमेदवारांने प्रवेशपत्रावर विहीत केलेल्या ठिकाणी स्वाक्षरी करुन उजव्या बाजूस स्वतःचा अलिकडच्या काळातील पासपोर्ट साईजचा फोटो चिकटवून तो राजपत्रित अधिकारी किंव विशेष कार्यकारी अधिकारी यांचेकडून साक्षांकीत करावा.

२) परिक्षा केंद्रावर प्रवेशपत्र व ओळखपत्रासह परिक्षा सुरु होणे पूर्वी एक तास अगोदर उपस्थित रहाणे आवश्यक. उशिरा येणाऱ्या व प्रवेश पत्र न आणणाऱ्या उमेदवाराला परिक्षेकरीता प्रवेश दिला जाणार नाही. तसेच उमेदवाराने स्वतःचे फोटो असलेले ओळखपत्र उदा.वाहन परवाना, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र इ. सोबत आणणेचे आहे.

३) काळया रंगाचा बॉलपेन, लेखन पॅड इ. परिक्षा साहित्यच परिक्षा केंद्रावर आणणेचे आहे. पेन्सिलने सोडविलेली उत्तरपत्रिका ग्राह्य धरली जाणार नाही.

४) परिक्षा कक्षात उमेदवारांने लेखनसामग्री व्यतीरिक्त वहया, कागदपत्रे व इतर वस्तू, मोबाईल आदी उपकरणे, गणितीय उपकरणे, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, ज्याने नक्कल / परिक्षेत गैरवापर करण्यास मदत होईल, अशा कोणत्याही वस्तू आणता कामा नये. आणल्यास अशा वस्तू जप्त करुन लेखी परीक्षेस बसू दिले जाणार नाही.

५) लेखी परीक्षेत कुठल्याही प्रकारची नक्कल वा अनुचित प्रकार चालणार नाही किंवा परीक्षा नियम भंग केल्यास सदर उमेदवारास परीक्षेस बसू दिले जाणार नाही. व त्याचेवर कायदेशिर कारवाई करणेत येईल. उमेदवारांना परीक्षेस बसवून घेण्याचा किंवा न घेण्याचा सर्वस्वी अधिकार हे परीक्षा प्रमुखांकडे राहतील.

६) परीक्षा वेळ संपले खेरीज कोणत्याही उमेदवारांस परिक्षा कक्ष सोडता येणार नाही. अन्यथा उत्तरपत्रिका रद्द समजणेत येईल.

७) उमेदवाने परिक्षेसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता तथा दैनिक भत्ता देण्यात येणार नाही.

Scanned by CamScanner